किमत: १०० रुपये

Registration with the Registrar of Newspapers for India
under No. MAHMAR/2016/69788

ISSN 2456-7213
वर्ष : तिसरे, अंक : पहिला, पृष्ठ संख्या: २४
Year: 3rd, Issue: 1st, No. Of Pages: 24


# आयुर्वेद विचार

AYURVED VICHAR
(Quarterly)


त्रैमासिक
जानेवारी, एप्रिल, जुलै, आणि ऑक्टोबर
या महिन्यांच्या १० तारखेस प्रकाशित



औषधी कल्पना ........................................ वै. पल्लवी गुणे

केसांचे विकार व उपचार ........................ वै. मिनल निचळ

वृक्करोग-निदान-चिकित्सा ................ डॉ. मीना सोनवणे

हृदय संवर्धन व आयुर्वेद ........................ डॉ. दिपा पाटील

निद्रायतं सुखं दुःखं... ......................... डॉ. रामदास कुटे

आयुर्वेद आणि तंत्रज्ञान ........................ कु. प्रसाद कांबळे

आयुर्वेद आणि मी ............................ श्री. स्वप्निल वेल्हाळ




आयुर्वेद विचार

जुलै ते सप्टेंबर २०१८

आशिर्वाद: गुरुवर्य कै. डॉ. हेमंत गणेश दामले
संपादक: डॉ. रामदास सुभाष कुटे
मार्गदर्शक: डॉ. जनार्दन बनकर, फलटण
कार्य. संपादक: डॉ. भारत रोकडे, पुणे
उप संपादक: डॉ. संजय सावंत, मुर्टी, बारामती
संपादक मंडळ: डॉ. मोनाली राजुरकर,जेजुरी
डॉ. सुदर्शन कापडणीस , नाशिक
डॉ. यशवंत भगत, बारामती
संयोजन: श्री. विशाल साळुंके
श्री. बापु थिकोळे
सौ. वर्षा साळुंखे-काटकर
सौ. सुमिता पाटील
कु. स्वप्निल रणवरे
कु. प्रसाद कांबळे

संपर्कासाठी कार्यालयाचा पत्ता:
आयुर्वेद विचार, १७५०, मोरगाव रोड, जेजुरी,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०३

अण्णाजी राव, पुणे – ७२७६०६५५५९
योगेश प्रभुणे, मुंबई – ९३२३१७५५९७
अभिजीत ढोबळे, पुणे – ९०२८४३४९२८
संदिप मगदूम, सांगली - ८६२५०२३८६०
राजाराम हडवळे, नारायणगाव - ९९२१०९१३०३
रुपेश गोलांडे, अहमदनगर - ९७६५९५२१६४
सारंग संधानशिव , नाशिक - ८०८७१६०१३२
अजय सिंग, मुंबई पश्चिम - ८८०६७८९१७३
राकेश द्विवेदी, मुंबई पूर्व - ९८६९२८०३८६
धनंजय जामवाडीकर, औरंगाबाद – ९९७०१६६२१२
अक्षय शेडगे, बारामती - ७७०९९२२२९४
विनायक देसाई, मुंबई पूर्व - ९७०२३७४०३९
विजय पौनिकर, नागपुर - ७०३८१११९४२६
अक्षय जाधव, सातारा - ७०३८९८६८९८
नागराज कुलकर्णी, बेळगाव - ९८४४२७७१०९
निखिल वाघमारे, सातारा - ९९२१९९३०२८
शिवानंद लकाबशेट्टी, सोलापूर - ९०९६६६४३६४
राजू वाघ, जळगाव - ८००७५६४७३२

डिक्लेरेशन क्र.:
टाईटल कोड : एम ए एच एम ए आर ४६२५९
रजि. नं.: एम ए एच एम ए आर /२०१६/६९७८८
दिनांक: २७/१२/२०१६
आय.एस.एस.एन. २४५६-७२१३
आय.एस.बी..एन. ९७८-८१-९३५४६६-०-४
'आयुर्वेद विचार'
मुद्रक: डॉ. रामदास कुटे
प्रकाशक: डॉ. रामदास कुटे
मालक: डॉ. रामदास कुटे
प्रिंटिंग प्रेस: कामथे प्रिंटिंग प्रेस,
धर्मवीर संभाजीराजे कॉम्प्लेक्स, मोरगाव रोड ,
जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०३
प्रकाशन स्थळ: १७५०, मोरगाव रोड, जेजुरी,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०३
संपादक: डॉ. रामदास कुटे

'Ayurved Vichar'
Printed By: Dr. Ramdas Kute
Published by: Dr. Ramdas Kute
Owner: Dr. Ramdas Kute
Printed at: Kamthe Printing Press
Dharmavir Sambhajiraje Complex,
Morgaon Road, Jejuri, Tal. Purandar,
Dist. Pune
Published at: 1750, Morgaon Road, Jejuri,
Tal. Purandar, Dist. Pune- 412303
Editor: Dr. Ramdas Kute


# ॥ अंतरंग ॥


१. औषधी कल्पना — वै. पल्लवी गुणे ५

२. विकारनिर्मिती मध्ये स्त्रोतसांचे महत्व — डॉ. एम. वी. मोकाशी ७

३. 'डॉक्टर' — डॉ. रश्मी घोलप ९

४. केसांचे विकार व उपचार — वै. मिनल निचळ ११

५. वृक्करोग-निदान-चिकित्सा — डॉ. मीना सोनवणे १३

६. हृदय संवर्धन व आयुर्वेद — डॉ. दिपा पाटील १८

७. निद्रायतं सुखं दुःखं... — डॉ. रामदास कुटे १९

८. आयुर्वेद आणि तत्वज्ञान — कु. प्रसाद कांबळे २१

९. आयुर्वेद आणि मी — श्री. स्वप्निल वेल्हाळ २२

# विकारनिर्मिती मध्ये स्त्रोतसांचे महत्व

विकार म्हणजे

विकारो धातुवैषम्यं साम्यं प्रकृतिरुच्यते।
सुखसंज्ञकमारोग्यं विकारो दु:खमेवच॥
-सु.उ.१/२७

विकार याचा सामान्य अर्थ आपण शरीरास होणारी कोणतीही पीडा किंवा त्रास असा घेऊ शकतो. शरीराच्या कोणत्याही सामान्य क्रियेमध्ये व्यत्यय उत्पन्न झाल्याने निर्माण होणारा कसलाही रोग किंवा व्याधी म्हणजे विकार म्हणता येईल.

वरील परिभाषेनुसार आयुर्वेद शास्त्रामध्ये विकार म्हणजे शरीरस्थ धातूंची विषमता 'धारणाद्धातवा: स्मृत:' म्हणजे जे घटक शरीराचे धारण आणि पोषण करतात त्या सर्वांना धातू (Biological Substance Metabolically Produced) म्हणतात, आणि विकाराच्या अवस्थेत शरीरातील हेच धातू विकृत झालेले असतात. अशी विकृती निर्माण होणे म्हणजेच रोग किंवा व्याधी उत्पन्न होणे आणि आयुर्वेद शास्त्राचे मुख्य प्रयोजन हे या धातूंची साम्यावस्था राखणे हेच आहे.

स्वस्थ व्यक्तिच्या स्वास्थाची रक्षा आणि रोगी व्यक्तीच्या व्याधीची चिकित्सा हे या धातूंच्या साम्य अवस्थेवरच अवलंबून आहे.

धातुसाम्य क्रिया चोक्ता तन्त्रस्यास्य प्रयोजनम्॥
-(च.सू.१/५३)

आता ही धातू वैषम्यता म्हणजेच विकार निर्माण झाल्यावर त्याला कारणीभूत असणारे घटक व त्यांचे विकार निर्मितीतील नेमके कार्य हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**स्त्रोतस संकल्पना**

'स्त्रु-स्त्रवणे' या धातुपासून स्त्रोतस शब्दाची उत्पति झाली आहे. याचा अर्थ (Exudation, Oozing, Filtration, Permeantaion) असा विविध अर्थी व्यापक आहे. 'स्त्रवणात स्त्रोतांसि' - ज्या अवयवापासून स्त्रवण कार्य होते त्यास स्त्रोतस म्हटले जाते.

शरीरात अनेक प्रकारची स्थूल : (Gross) व सूक्ष्म (Microscopic) अशी स्त्रोतसे आहेत. स्त्रोतस शब्दाने सामान्यत: सर्व प्रकारचे वहन मार्ग लहान - मोठे, दृश्य-अदृश्य की जे शरीरात एक प्रकारची वहन यंत्रणा निर्माण करतात. (Internal transport system) ते गृहीत धरले जातात, स्त्रोतस शब्दाच्या पर्याय नावांवरुन या शब्दाची व्यापकता समजून घेता येईल. उदा. स्त्रोतांसि : (channels) शिरा : (Veins), धमन्या: (Arteries), रसायन्या (Lymphatics,Ducts) :, रसवाहिन्या : (Capillaries), नाड्या :(Tubular Conduction), पंथान : (Passages), मार्गा :(Pathways-Tracts), शरीरछिद्राणी: (Body Orifices, openings, Cavities), संवृतानि : (Blind), असंवृतानि :(Open Passages), स्थानानि (Sites), आशया (Regions), निकेता :(Resorts), शरीर धातु अवकाशांना लक्ष्य अलक्ष्याणां नामानि भवन्ति । या वहनमार्गांचा वर्ण व आकार त्या त्या धातुसारखा असतो. उदा.कदली समान: (cylindricak), स्थुल :(Gross or Macroscopic), सूक्ष्म :(Microscopic), दीर्घ अथवा प्रतानसदृश : Reticulated इत्यादि.

''यावन्त पुरुषो मूर्तिमन्तो भावविशेषास्तावन्त
एवास्मिन् स्त्रोतसां प्रकारविशेषा:॥''
-(च.वि ५/३)

पुरुषामध्ये अर्थात मानवी शरीरामध्ये जितके मूर्त भावविशेष आहेत तितकेच स्त्रोतसांचे प्रकार उपस्थित आहेत. स्त्रोतसे ही अन्नादी पदार्थ व त्यांचे बनलेले धातु यांना शरीरभर पसरवणारी आहेत. म्हणून स्त्रोतसे व त्यातून वहणारे रसरक्तादी धातू या दोहोंचे मिळून शरीर बनले आहे. व शरीर हेच विकाराचे मुख्य अधिष्ठान आहे.
प्रसाद धातु व मलद्रव्य यांचे वहन करणे, पोषक द्रव्य पोष्यधातुपर्यंत पोहचवणे, मलद्रव्याचा त्याग व उत्सर्जन ही सर्व कार्य स्त्रीतसांमार्फत केली जातात स्त्रोतसांचे हे कार्य आधुनिक दृष्ट्या Mechanism and Dynamics of the



डॉ. एम्.व्ही. मोकाशी
एम्.डी.(आयु)
राधाकृष्ण क्लिनिक
शास्त्रीनगर, कोल्हापूर
mvmokashi@rediffmail.com
मो.नं: ९४२३८५८४५८



Exchange of Fluid across Capillaries याच्याशी मिळते जुळते आहे.

### स्त्रोतीविकृती

ही स्त्रोतीविकृती - अतिप्रवृत्ती, (Increased Permeability) संग, (Passive Congestion) सिराग्रंथि (Vasodilatation due to obstruction) व विमार्गगमन (Chenge in direction) या स्वरुपात व्यक्त होते. व या स्त्रोती विकृतीमुळे विकार निर्मितीस चालनाच मिळते. रोग अथवा विकार उत्पन्न होताना घडणाऱ्या प्रक्रिया म्हणजे 'संप्राप्ती' (Pathology of diseases) संप्राप्तीमध्ये स्त्रोतसांचे महत्व वैशिष्टयपूर्ण आहे. कारण शरीरातील कोणत्याही भावविशेषाची उत्पत्ती – क्षय व वहन स्त्रोतसाशिवाय होऊ शकत नाही. जेव्हा स्त्रोतसांची अखंडता राहत नाही किंवा विकृती निर्माण होते त्यावेळी स्थानस्थ व मार्गग धातूदेखील विकृत होतात व ही विकृती एका धातूपासून दुसऱ्या स्त्रोतसांपर्यंत पसरते.

''कुपितानां ही दोषाणां शरीरे परिधावताम्
यत्र संगः खवैगुण्यात् व्याधीः तत्र उपजायते ॥''

-(सुश्रुत निदान ४/१३)

या ठिकाणी ख- वैगुण्य म्हणजेच स्त्रोतसांची दुष्टी वा ज्या ठिकाणी स्त्रोतोविकृती आढळेल त्या ठिकाणी कुपित दोषांचा संग घडून व्याधी निर्माण होईल हे स्पष्ट आहे.

थोडक्यात स्त्रोतसे या शब्दाने एक सुक्ष्म धातुपरमाणुमागुन ते स्थूल अशा सर्व दृश्यमार्ग अवयव शरीर घटकांचा बोध होतो. पोष्य धातूंची उत्पत्ती, धातुपोषण, पोषक धातुंचे वहन, स्त्रवण, मलद्रव्यांचे विभाजन – वहन ही सर्व कार्ये स्त्रोतसांकडून होत असतात. ही कार्ये व्यवस्थित चालू असेपर्यंत स्त्रोतस प्राकृत असते काही कारणांनी या कार्यात व्यत्यय आल्यास ही सर्व कार्ये परस्परावलंबक असल्याने सर्वच कार्यात् शैथिल्य निर्माण होते व यासच स्त्रोतोवैगुण्य म्हटले जाते. अनेक धातुपरमाणूंमध्ये वैगुण्य निर्माण झाल्यास अवयव कार्य विकृति दिसून येते व यालाच विकार निर्मिती म्हटले जाते. अशा प्रकारे विकार निर्मितीमध्ये स्त्रोतसांचे महत्व अनन्यसाधारण आहे.

■■